जनसंपर्क कक्ष

01 FEB 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनात विद्यार्थ्यांनी पुढे यावे : डॉ. पाटील




**गारगोटी :** शाहू कुमार भवनमध्ये पारितोषिक वितरणप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, मधुकर देसाई, डॉ. एस. बी. शिंदे, मिलिंद पांगिरेकर आदी.

गारगोटी, ता. ३१ : जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी जिद्द, आत्मविश्वास व प्रयत्नात सातत्य ठेवावे. चांगले आदर्श, ध्येये डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करावी. संशोधनात विद्यार्थ्यांनी पुढे यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

येथील मौनी विद्यापीठाच्या शाहू कुमार भवनमधील वार्षिक स्नेहसंमेलन अंतर्गत पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्थेचे चेअरमन मधुकर देसाई अध्यक्षस्थानी होते. डॉ. पाटील, रेश्मा देसाई, मेघा देसाई, मुख्याध्यापक मिलिंद पांगिरेकर, डी. एस. देसाई, व्ही. जे. कदम यांच्या हस्ते पारितोषक वाटप झाले.

डॉ. पी. बी. दराडे, डॉ. खोपडे, सुनील राजिगरे, डॉ. शरद व्हनाळकर, डॉ. सागर व्हनाळकर, एम. एस. मोरूस्कर, विक्रम भोसले, बी. एस. केसरकर, सौ. शर्मिला पाटील आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक डॉ. एस. बी. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. संगीता पाटील, युवराज बिरंबोळे यांनी सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षक डी. डी. मांडे यांनी आभार मानले.

सकाळ

# हवामानातील बदल लक्षात घेऊन संशोधन करा : पाटील

## शिवाजी विद्यापीठात 'स्तुती' प्रशिक्षणाचा प्रारंभ

**▶सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : जागतिक तापमान आणि हवामानातील बदल लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी संशोधन करावे. एक सुदृढ शाश्वत समाजनिर्मितीसाठी प्रयत्न करा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी येथे केले.

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे शिवाजी विद्यापीठात आयोजित 'स्तुति' प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य हे ऑनलाईन उपस्थित होते. 'डीएसटी'च्या विविध योजनांची माहिती डॉ. भट्टाचार्य यांनी दिली. सैफ सेंटरमधील अद्ययावत उपकरणांचा पुरेपूर वापर विद्यार्थी, संशोधक, उद्योजकांनी करावा. शिवाजी विद्यापीठ हे 'पीएमयू' म्हणून चांगली कामगिरी करत असल्याचे त्यांनी सांगितले. 'स्तुति'चे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी शिवाजी विद्यापीठातर्फे घेतलेल्या २१ प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती दिली. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे डॉ. पंकज पोतदार यांनी आधुनिक संशोधनामध्ये ॲटोमिक फोर्स मायक्रोस्कोप या उपकरणाचे महत्त्व सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञानशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. के. वाय. राजपुरे यांनी एक्स रे फोटो इलेक्ट्रॉन स्पेक्टरोस्कोप या अत्याधुनिक उपकरणाची माहिती दिली. दुसऱ्या सत्रामध्ये सर्व सहभागी शिक्षक, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांना सैफ सेंटरमधील उपकरणांचे गटानुसार प्रात्यक्षिक देण्यात आले. 'स्तुति'चे सहसमन्वयक डॉ. टी. डी. डोंगळे उपस्थित होते. सत्यशीला धोंगडे यांनी सूत्रसंचालन केले. वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. या वेळी आर. जी. सोनकवडे, पंकज पोतदार, टी. डी. डोंगळे उपस्थित होते.

01 FEB 2023 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आर. जी. सोनकवडे यांचा सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. होमी भाभा, डॉ. सी व्ही रमण, डॉ. विक्रम साराभाई आदी शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केलेल्या बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेत डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी मार्गदर्शन केले. याच संस्थेने भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाद्वारे समर्थित इंडियन सायन्स टेक्नॉलॉजी अँड इंजिनियरिंग फॅसिलिटीज मॅप नावाचे नवीन पोर्टल तयार केले आहे. अशा नामवंत संस्थेने राज्यभरातून एकमेव डॉ. सोनकवडे यांचा गौरव केला.

बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेत आयएसटीएम मॅनेजमेंट कॉनक्लेव्ह २०२३ हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात संशोधन आणि



कोल्हापूर : डॉ. आर. जी. सोनकवडे यांचा सत्कार करताना प्रा. एस. ए, शिवशंकर, डॉ. संजीवकुमार श्रीवास्तव.

प्रयोगशाळांच्या विकासाचे तांत्रिक व्यवस्थापन या विषयावर चर्चा झाली. या कार्यक्रमात देशभरातून केवळ कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठ सैफ केंद्र, बेंगळुरू येथील केंद्रीय क्ष-किरण सुविधा, आणि तामिळनाडू कोईम्बतूर येथील भरथियार विद्यापीठ या तीन संस्थांचा आयआयसीएसचे प्रा. एस. ए. शिवाशंकर, आय-एसटीईएमचे राष्ट्रीय समन्वयक, डॉ. संजीव कुमार श्रीवास्तव यांच्या हस्ते सत्कार झाला. या सत्काराबद्दल कुलगुरू डॉ.डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी डॉ. सोनकवडे यांचे अभिनंदन केले.

तरूण भारत

# स्तुती प्रशिक्षणात दिली उपकरणांची माहिती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्तुति अंतर्गत चालू असलेल्या आठवडा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी स्तुति प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प - सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी "झए या उपकरणावरती मार्गदर्शन केले. या उपकरणाचा वेगवेगळ्या क्षेत्रात कसा उपयोग होऊ शकतो यासंदर्भात माहिती दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञानशास्त्र विभागाचे डॉ. निलेश तरवाळ यांनी फोटोल्युमिलेसन्स या विषयावर मार्गदशन केले. या उपकरणावर नमुने तपासणी विषयी माहिती दिली. सर्व सहभागी शिक्षक प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांना उपकरण प्रत्यक्षपणे हाताळण्याची संधी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. निलेश तरवाळ यांचा सत्कार करताना डॉ. आर. जी. सोनकवडे.

मिळत आहे. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी भारत सरकारचा विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि विशेष करून प्रा. आर. जी. सोनकवडे यांचे आभार मानले.

लोकमत

# डॉ. कराडे यांच्या ग्रंथास आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांच्या ग्रंथास 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार' जाहीर झाला आहे. मलेशिया येथे आयोजित दुसऱ्या आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलनामध्ये त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

मलेशिया येथील डॉ. आंबेडकर वेल्फेअर असोसिएशन आणि नागपूर स्थित जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे क्वालालंपूर येथे येत्या ४ व ५ फेब्रुवारी रोजी दुसरे आंबेडकरवादी विश्व साहित्य होणार आहे. यामध्ये डॉ. जगन कराडे यांच्या 'डेव्हलपमेंट ऑफ शेड्युल्ड कास्ट्स ॲण्ड शेड्युल्ड ट्राईब्ज इन इंडिया' ग्रंथाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार जाहीर झाला आहे. ४ फेब्रुवारीला तो त्यांना देण्यात येणार आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे आणि सचिव सुजीतकुमार मुरमाडे यांनी ही माहिती प्रसिद्धीपत्रकातून दिली.

पुण्यनगरी

# डॉ. कराडे यांच्या ग्रंथास डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांच्या ग्रंथास 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार' जाहीर झाला आहे. मलेशिया येथे आयोजित दुसऱ्या आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलनामध्ये त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मलेशिया येथील डॉ. आंबेडकर वेल्फेअर असोसिएशन आणि नागपूरस्थित जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने क्वालालंपूर (मलेशिया) येथे येत्या ४ व ५ फेब्रुवारी रोजी दुसरे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. डॉ. जगन कराडे यांच्या 'डेव्हलपमेंट ऑफ शेड्युल्ड कास्टस् अँड शेड्युल्ड ट्राईब्ज इन इंडिया' या बहुचर्चित ग्रंथाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार जाहीर झाला आहे. ४ फेब्रुवारी रोजी तो त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे आणि सचिव सुजितकुमार मुरमाडे यांनी पत्राद्वारे ही माहिती दिली आहे.

पुढारी

# डॉ. जगन कराडे यांच्या ग्रंथास पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांच्या ग्रंथास डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार जाहीर झाला आहे.

मलेशिया येथील डॉ. आंबेडकर वेल्फेअर असोसिएशन व नागपूर स्थित जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने क्वालालंपूर (मलेशिया) येथे ४ व ५ फेब्रुवारी रोजी दुसरे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन होणार आहे. या संमेलनामध्ये विविध साहित्यिकांना पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे, सचिव सुजितकुमार मुरमाडे यांनी पत्राद्वारे दिली आहे.

पुढारी

# भगवान महावीर अध्यासनास देणगी

कोल्हापूर : सुरगोंडा पाटील यांनी मातोश्री लक्ष्मीबाई जनगोंडा पाटील यांच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी २५ हजार रुपयांची देणगी अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली. बृहत देणगीबद्दल त्यांचा ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. बृहत देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले आहेत.

लोकमत

# विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनास देणगी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी सुरगोंडा पाटील यांनी आपल्या मातोश्री श्रीमती लक्ष्मीबाई जनगोंडा पाटील यांच्या स्मरणार्थ २५ हजार रुपयांची देणगी डॉ. विजय ककडे यांच्याकडे मंगळवारी सुपुर्द केली. याबद्दल त्यांचा ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पाटील यांचे आभार मानले.

01 FEB 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भोवताल

डॉ. व्ही.एन. शिंदे

# प्रदूषित नद्या

आज नद्यांच्या प्रदूषणाचा प्रश्न अत्यंत गंभीर आणि वैश्विक बनला आहे. खरे तर नद्यांना जीवनदायिन्या म्हणून ओळखले जाते. मात्र, त्यांनाच प्रदूषणाचा विळखा पडल्याने त्या विषवाहिन्या बनू लागल्या आहेत. हे जाणणाऱ्या लोकांची संख्या अतिशय कमी आहे. नद्यांचे पाणी प्रदूषित करणारे अनेक हात आहेत. त्यापैकी अनेकांना कायम माझ्या एकट्यामुळे नदी प्रदूषित व्हायची थोडेच थांबणार आहे असे वाटते. बहुतांश नागरिकांचे असेच मत असल्याने नद्यांचे प्रदूषण वाढतच आहे. त्यातच नद्यांच्या प्रदूषणामागेही अनेक आर्थिक बाबी आहेत. त्यामुळे नद्यांच्या प्रदूषणाचा प्रश्न चुटकीसरशी सोडवणे शक्य नाही. तसेच हा प्रश्न फक्त भारतापुरता मर्यादित नाही, तर वैश्विक आहे. जगातील ४४ टक्के नद्यांतील पाणी हे पिण्यासाठी आणि मासेमारीसाठी अयोग्य असल्याचे अभ्यासक जॉन केरी यांचे मत आहे. 'काँझर्व्ह-एनर्जी-फ्युचर' संस्थेच्या संकेतस्थळावर जगातील २१ सर्वाधिक प्रदूषित नद्यांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार जगातील सर्वच राष्ट्रांत हा प्रश्न गंभीर आहे.

या संकेतस्थळावरील सध्या उपलब्ध असलेल्या २१ नद्यांमध्ये भारतातील दोन मोठ्या नद्या गंगा आणि यमुना यांचा समावेश होतो. गंगा नदी तर पहिल्या क्रमांकावर आहे. भारतासह चीन, ब्राझील, इंडोनेशिया, अमेरिका, युरोप, फिलीपाईन्स, बांगलादेश, अर्जेंटिना, जॉर्डन, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया अशा सर्वच देशांना ग्रासले आहे. यात सर्व नद्यांच्या प्रदूषणामागे मानवाचा हात आहे. यातील सर्वात जास्त दहा प्रदूषित नद्यांचा विचार करणार आहोत.

भारतात गंगा नदीला सर्वात जास्त महत्त्व. या नदीत स्नान केले की सर्व पापे धुतली जातात, हा एक समज. त्यामागे श्रध्दा आहे. मृतदेह या नदीत सोडले की मृतात्म्याला स्वर्गप्राप्ती होते, अशीही अनेकांची श्रद्धा. या नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणात मानवी वस्ती आहे. या नागरी वस्तीला जगवण्यासाठी नदीच्या पाण्याचा उपयोग होतो. गंगेला पाणी मोठ्या प्रमाणावर असल्याने तिथे अनेक उद्योग उभारण्यात आले. या उद्योगधंद्याना लागणारे पाणी गंगा नदी पुरवते. हे पाणी वापरून स्वच्छता आणि सुबत्ता प्राप्त केली जाते. वापरलेले अनेक जीवांना अपाय करणाऱ्या घटक सामावून घेत असलेले, घाण पाणी इतरत्र न पाठवता पुन्हा गंगेत सोडले जाते. जगातील तिसऱ्या क्रमांकाची लांबी असणारी गंगा नदी आहे. तिच्यात मलमूत्रयुक्त पाणी सर्वाधिक प्रमाणात मिसळते. त्यामुळे आज सर्वात पवित्र मानली जाणाऱ्या गंगा नदीचे, जगातील सर्वाधिक प्रदूषित नद्यांमध्ये पहिले स्थान आहे. भारत सरकारने गंगा नदी स्वच्छतेसाठी खास अभियान सुरू केले. तरीही अद्याप या नदीत मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे, दुर्दैवाने हे वास्तव आहे.

चीनने औद्योगिक उत्पादनाची बाजारपेठ काबीज करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे उभे केले. पीत नदीच्या काठी मोठ्या औद्योगिक वसाहती उभारल्या. मुळातच विशिष्ट खडकातून वाहिल्याने या नदीच्या पाण्याला पिवळा रंग येतो. त्यात काठावरील उद्योगांनी सोडलेल्या घाण पाण्यामुळे नदी आणखी प्रदूषित झाली आहे. सध्या ती दुसऱ्या क्रमांकाची प्रदूषित नदी आहे. खनिजावरील प्रक्रिया करणारे अनेक उद्योग वापरलेल्या घाण पाण्याचा विसर्ग पीत नदीत सोडतात. त्यामुळे हे पाणी पिण्यासाठी तर नाहीचं, पण शेतीसाठी वापरण्यासही योग्य राहिले नाही.

जगातील तिसऱ्या क्रमांकाची प्रदूषित नदी आहे, ब्राझीलमधील डोस नदी. या नदीच्या काठावर स्टीलचे कारखाने उभा राहिले. एकेकाळी शुद्ध पाणी असलेली ही नदी आता प्रदूषित आणि विषारी पाण्याची वाहक बनली आहे. त्यानंतर सर्वाधिक प्रदूषित नद्यात चवथा



क्रमांक हा इंडोनेशियातील सीटारम नदीचा लागतो. इंडोनेशियाच्या नागरी वस्त्यांना जगवणाऱ्या या नदीच्या दोन्ही बाजूला मोठी नागरी वस्ती आहे. या वस्त्यांतून येणारे मलमूत्रमिश्रित पाणी हे नदीच्या पाण्याचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण करते. तसेच औद्योगिक वसाहतीतून येणाऱ्या घाण पाण्यामुळे, या नदी काठावरील संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात आली आहे. विशेषतः पारायुक्त पाणी नदीत आल्याने धोका वाढला आहे. या नदीतील प्रदूषित पाण्यामुळे वर्षाला ५० हजार नागरिकांचा मृत्यू ओढवतो.

जगातील पाचव्या क्रमांकाची प्रदूषित नदी आहे अमेरिकेतील मिसिसीपी. जगातील ही सर्वाधिक लांबीची नदी. वापरलेले पाणी नदीत सातत्याने सोडले जात असल्याने आज तिचे पाणी तपकिरी रंगाचे झाले आहे. पाण्यावर तेलाचा तवंग असतो आणि आत विषारी घटक. नायट्रोजनयुक्त घटकांमुळे नदीतील ऑक्सिजनचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले असून नदीतील जीवसृष्टी संपुष्टात आली आहे. त्यानंतर सहावा क्रमांक हा सर्नो नदीचा. युरोपातील ही सर्वाधिक प्रदूषित नदी. उगम ठिकाणी या नदीचे पाणी सर्वोत्तम आहे. पुढे नदीकाठावरील मानवी वस्त्यांचे सांडपाणी, मैलायुक्त पाणी आणि उद्योगातील वापरलेले पाणी नदीत सोडले जाते. त्यामुळे नदीचे पाणी वापर योग्य रहात नाही. या नदीकाठच्या नागरिकांमध्ये यकृताच्या कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे.

जगातील सर्वाधिक प्रदूषित नद्यात सातव्या क्रमांकावर फिलिपाइन्समधील मरिलिओ नदी आहे. या नदीला प्लास्टिकचे डम्पिंग ग्राऊंड बनवले आहे. त्यानंतर आठवा क्रमांक हा आपल्या शेजारच्या बांगलादेशातील बरिगंगा नदीचा लागतो. बांगलादेशातील ही सर्वात मोठी नदी. या नदीला वेगळ्याच समस्येने ग्रासले आहे. या नदी काठावर मोठ्या प्रमाणात चर्मोद्योग उभारण्यात आले आहेत. चर्मोद्योगासाठी वापरण्यात आलेले पाणी या नदीत सोडण्यात येते. त्या पाण्याने या नदीच्या प्रदूषणाला मोठा हातभार लावला आहे. त्याचप्रमाणे अन्य नद्यांप्रमाणे या नदीतही मानवी वस्त्यांचे घाण पाणी आणि अन्य उद्योगांचे वापरलेले पाणी सोडले जाते. ही नदी प्रदूषित झाल्याने बांगलादेशासमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

नवव्या क्रमांकावर आता अर्जेंटिनातील मांताझा-रियाचुलो नदी आली आहे. पारा आणि शिशाच्या अंशानी भारलेले हे पाणी नदीतील संपूर्ण जीवसृष्टी नष्ट करत आहे. जड धातूमुळे कर्करोगाची बाधाही अनेक लोकांना होत आहे. दहावा क्रमांक मेक्सिकोतील तिजुआना नदीचा लागतो.

नदी प्रदूषणाने जगातील सर्व देश ग्रासले आहेत. या प्रश्नाने आता वैश्विक रूप धारण केले आहे. इतर संस्थांच्या सर्वेक्षणातही याच नद्या क्रमांकातील थोड्या फार फरकाने समाविष्ट आहेत. भविष्यात महायुद्ध झाले तर पाण्यामुळे होईल असे तज्ज्ञ सांगतात. पाण्यामुळे युद्ध होईल किंवा नाही हे सांगता येत नसले, तरी यादवी निश्चितच निर्माण होऊ शकते. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि आपले पाण्याचे साठे स्वच्छ ठेवण्याकडे प्रत्येकाने जातीने लक्ष देण्याची गरज आहे. नाही तर आज पाण्यातील जीव मरतात, उद्या आपला क्रमांक असेल.

संपर्क : ९६७३७८४४००
vilasshindevs44@gmail.com

01 FEB 2023 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेचे सलग दुसऱ्यांदा अजिंक्यपद पटकावलेला महावीर महाविद्यालयाच्या संघासोबत प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, डॉ. रोहित पाटील, बाबासाहेब उलपे व प्रा. स्वप्नील खोत आदी.

# महावीर महाविद्यालयाला सलग दुसऱ्या वर्षीही जेतेपद

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेअंतर्गत झालेल्या अंतिम सामन्यात महावीर महाविद्यालयाने डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्सवर ७ गडी राखून विजय मिळवत सलग दुसऱ्यांदा अजिंक्यपद पटकावले. शिवाजी विद्यापीठातील मैदानावर हा सामना झाला. कागलमधील डी. आर. माने महाविद्यालयाच्या वतीने शिवाजी विद्यापीठातील मैदानावर स्पर्धेचे आयोजन केले होते.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स संघाने सर्व बाद १६० धावा केल्या होत्या. त्यामध्ये प्रथमेश बाजारीने ३३ व हर्षवर्धन जाधवने ४७ धावांचे योगदान दिले. गोलंदाजी करताना महावीर महाविद्यालयाच्या अंकित मुखर्जी व प्रथमेश पाटील यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल खेळताना महावीर महाविद्यालयाच्या फलंदाजांनी धडाकेबाज फलंदाजी करत कॉमर्स कॉलेजच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. सामन्यात असे जरी घडले असले तरीही सुरुवातीला महावीर महाविद्यालयाची ३ बाद ४० धावा अशी बिकट परिस्थितीही कॉमर्स कॉलेजच्या गोलंदाजांनी केली होती. मात्र महावीरचा कर्णधार यश पाटीलने चौफेर फटकेबाजी करत ४८ व प्रथमेश पाटीलने नाबाद ६२ धावा ठोकून महावीरला सामना जिंकून देतानाच स्पर्धा विजेतेपदाचा सरताजही मिळवून दिला.

स्पर्धा विजेत्या महावीर महाविद्यालयाच्या संघाला प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रोहित पाटील, अधिव्याख्याता बाबासाहेब उलपे, प्रा. स्वप्नील खोत यांचे मार्गदर्शन लाभत आहे. दरम्यान, संपूर्ण स्पर्धेत चांगली खेळी केलेल्या खेळाडूंचा मिळवून शिवाजी विद्यापीठाचा संघ तयार करण्यात आला आहे. राजस्थान येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत हा संघ सहभागी होणार आहे.